# दमदार विजयासह पुणेरी पलटन गुणतालिकेत अव्वल स्थानी! युपी योद्धावर मिळवला ४३-३२ ने दमदार विजय

विशाखापट्टणम, १० सप्टेंबर २०२५: प्रो कबड्डी लीग स्पर्धेच्या १२ व्या हंगामातील २६ वा सामना पुणेरी पलटण आणि युपी योद्धा या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पुणेरी पलटनचे चढाईपटू चांगलेच चमकले. आदित्य शिंदे आणि पंकज मोहिते यांच्या सुपर टेनच्या बळावर पुणेरी पलटनने हा सामना ४३- ३२ च्या फरकाने जिंकला. यासह गुणतालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून आदित्य शिंदेने सर्वाधिक १२ गुणांची कमाई केली. तर पंकज मोहितेने १० गुणांची कमाई करत सुपर १० पूर्ण केलं. युपी योद्धाकडून गगन गोवडा चमकला. त्याने १२ गुणांची कमाई केली. पण युपी योद्धाचा संघ हा सामना जिंकू शकला नाही.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदारने नेहमीप्रमाणे एक गुण घेत संघाला खातं उघडून दिलं. युपी योद्धाकडून गुमान सिंगने देखील बोनस घेऊन संघाला १ गुण घेत सुरुवात करून दिली.

पंकज मोहितेने सामन्यातील चौथ्या मिनिटाला हनुमान उडी घेत ४ गुणांची कमाई केली आणि संघाला आघाडी मिळवून दिली. सामन्यातील सहाव्या मिनिटाला पुणेरी पलटनकडे युपी योद्धाला ऑलआऊट करण्याची संधी होती. पण पंकज मोहिते बाद झाल्याने युपी योद्धाला सुपर टॅकल मिळाला आणि ऑलआऊट टळला. पूर्वार्धातील सुरुवातीची १० मिनिटे पूर्ण झाल्यानंतर  दोन्ही संघ ९- ९ गुणांसह बरोबरीत होते.

पूर्वार्धातील १३ व्या मिनिटाला आदित्य शिंदे पुणेरी पलटनकडून चमकला. त्याने  युपीचे ३ बचावपटू असताना २ गुणांची कमाई केली. पूर्वार्धातील १५ व्या मिनिटाला युपी योद्धाचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने १६-१२ गुणांसह ४ गुणांची आघाडी घेतली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ २१- १६ ने आघाडीवर होता.

पूर्वार्धात मागे पडलेल्या पुणेरी पलटनने उत्तरार्धात दमदार सुरुवात केली. सुरुवातीची ५ मिनिटे पूर्ण झाल्यानंतरही पुणेरी पलटनचा संघ आघाडीवर होता. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पंकज मोहितेने आपलं सुपर टेन पूर्ण केलं. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनचा संघ ४०-२८ ने आघाडीवर होता. पलटनने हा सामना ४३-३२ ने आपल्या नावावर केला.

या दिवसातील पहिला सामना यू मुंबा आणि तेलुगू टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत तेलुगू टायटन्स संघाचं वर्चस्व पाहायला मिळालं. हा सामना तेलुगू टायटन्स संघाने ४५- ३७ च्या फरकाने आपल्या नावावर केला.